# झगमगणाऱ्या सुखापलीकडे

(वेध गीत - २००७)

झगमगणाऱ्या सुखापलीकडे
अेक नजर तू टाक रे
मनात लपल्या सवंगड्याची
अैकू येऊ दे हाक रे ।। धृ ।।

अमुचे अंगण वसुंधरा ही
तिच्याभोवती फास रे
हिरवाईची अम्ही लेकरे
कसा गिळावा घास रे ।। १ ।।

माझेमाझे वेचतवेचत
मीच बनवतो कोश रे
विलासात मग विकास हरवे
हीच अटळ खूणगाठ रे ।। २ ।।

भविष्य घडवू समृध्दीचे
संयम त्याचा श्वास रे
स्वार्थ साधूया परमार्थातून
हाच आमुचा ध्यास रे ।। ३ ।।